प्रसिद्धी विभाग

प्रभात | पुणे जिल्हा | रविवार, दि. २१ सप्टेंबर २०१४

# संघर्ष करून 'त्यांना' मिळाली पीएच.डी.

## प्रा. घुलेंचा संघर्ष प्रवास : तत्कालीन राष्ट्रपतींनी घातले लक्ष



राजगुरूनगर, दि. २० (वार्ताहर) - येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. महादेव घुले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळविण्यासाठी प्रा. घुले यांना राष्ट्रपती, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यापर्यंत संघर्ष करावा लागला.

गेली अनेक वर्षे येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. महादेव घुले यांनी पीएच.डी. पदवी मिळविण्यासाठी १९ मार्च १९९९ मध्ये पीएच.डी.साठी नोंदणी केली होती. १७ मार्च २००५मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठाकडे महाराष्ट्र शासन महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे प्रशासकीय व न्यायालयीन अधिकार एक अभ्यास या विषयावर प्रबंध सादर केला. त्यावर त्यांची विद्यापीठात मौखिक परीक्षा झाली. मात्र या परीक्षेचा निकाल निवड समितीने नियमबाह्य दिला. परिणामी प्रा. घुले हे पीएच.डी. पदवीपासून वंचित राहिले.

प्रा. घुले यांनी पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या विरोधात राज्यपाल एस. एम. कृष्णा यांच्याकडे तक्रार दाखल केली. राज्यपाल कृष्णा यांच्याकडे अनेकदा याबाबत लक्ष घालण्यासाठी स्मरणपत्रे पाठविली. मात्र त्याची दखल घेतली गेली नाही. शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांनी दिल्ली येथे जाऊन तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची भेट घेऊन याबाबत लक्ष घालण्याची मागणी केली. याबाबत त्यांनी विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रबंधाबाबत माहिती दिली.

त्यावेळी राष्ट्रपती पाटील यांनी राज्यपाल कृष्णा यांना प्रा. घुले यांच्या प्रकरणात लक्ष घालण्याचे आदेश दिले. प्रा. घुले यांच्या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी होऊन याबाबत विद्यापीठाला आदेश देण्यात आले. राज्यपालांच्या आदेशामुळे पुणे विद्यापीठाने प्रा. महादेव घुले यांना २ सप्टेंबर २०१४ पीएच.डी. पदवी जाहीर केली आहे.